# समाज स्वास्थ्य सुधारण्याची जबाबदारी शिक्षकांनी घ्यावी : मोरे

देगलूर, ता.२२ (बातमीदार) : सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात समाज माध्यमाची वाढती संख्या पाहता यातून येणाऱ्या संदेशामुळे समाजमनाच्या भावना थोडक्या, थोडक्या गोष्टीतून दुखावल्या जात असताना दिसून येत आहेत यावर नियंत्रण मिळविण्याकरिता सामाजिक शास्त्र शिक्षकांनी शिक्षणातूनच समाज स्वास्थ सुधारण्याची जबाबदारी घेतली पाहिजे असे मत लातूरचे शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे यांनी व्यक्त केले.

मोरे यांनी नुकतेच देगलूर महाविद्यालयाला भेट दिली, त्यावेळी त्यांनी प्राध्यापकांशी संवाद साधला. या वेळी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार प्र. प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार उपस्थित होते. त्यांनी यावेळी कनिष्ठ महाविद्यालयात चालणाऱ्या उपक्रमाचा आढावा मोरे यांनी घेतला. पुढे बोलताना ते म्हणाले की कनिष्ठ महाविद्यालयाच्या वेळापत्रका मध्येच अभ्यासक्रमाच्या विषयाची एक तासिका, स्पर्धात्मक परिक्षेच्या दृष्टिकोनातून शिकविली पाहिजे जेणे करून इयत्ता अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेची आवड निर्माण होऊन ते स्पर्धेच्या युगात यशस्वी होतील. अशा प्रकारचे उपक्रम कनिष्ठ महाविद्यालयात राबवली गेली पाहिजे. या वेळी मोरे व अधीक्षक देशपांडे यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी जुक्टा संघटनेचे प्रा. डॉ.शेरीकर यांनी उच्चमाध्यमिक उन्हाळी सुट्ट्या बाबतचे निवेदन मोरे यांना दिले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महेश कुलकर्णी यांनी त्यांची प्रकाशित पुस्तके भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संग्राम पाटील यांनी तर आभार प्रा. महेश कुडलीकर यांनी मानले.